**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,**
AURANGABAD -431 004 Maharashtra, India
NAAC Re-accredited "A" Grade

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
औरंगाबाद-४३१ ००४ महाराष्ट्र,भारत
नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त

स्थापना वर्ष-१९५८

P.G.Admission Section
पदव्युत्तर प्रवेश विभाग

PG. Office :- (0240) 2403123 WEB SITE : www.bamu.ac.in http://bamua.digitaluniversity.ac. E-mail : pgsection@bamu.ac.in

# परिपत्रक

मा. प्र. कुलगुरु यांच्या आदेशान्वये या परिपत्रकाव्दारे सर्व विभाग प्रमुख, विद्यापीठ परिसर, उप-परिसर, उस्मानाबाद, मॉडेल कॉलेज घनसांवगी, जि. जालना तसेच सर्व संलग्नित पदव्युत्तर महाविद्यालयाचे प्राचार्य यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाव्दारे विद्यापीठ परिसर, उप-परिसर, उस्मानाबाद, मॉडेल कॉलेज, जालना येथील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेशपूर्व परीक्षा ही २०१८-२०१९ करीता सर्व विद्याशाखेला लागू राहिल, असा निर्णय घेण्यात आलेला होता. त्यानंतर दि. २० मार्च २०१८ रोजी अधिसभेच्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होवून असा ठराव पारित करण्यात आला की, "सर्व संलग्नित महाविद्यालये येथील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेशपूर्व परीक्षा ही २०१८-२०१९ करीता फक्त विज्ञान व तंत्रज्ञान या विद्याशाखेस व वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र या विद्याशाखेतील एम.कॉम. पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता लागू राहिल. तसेच पदवी व पदव्युत्तर पदविका (यु.जी. व पी.जी. डिप्लोमा) या अभ्यासक्रमास विद्यापीठ परिसर, उप-परिसर, उस्मानाबाद, मॉडेल कॉलेज, जालना तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयांना केंद्रीय प्रवेशपूर्व परीक्षा २०१८-२०१९ करीता लागू राहणार नाही"

कृपया यांची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, तसेच या परिपत्रकाबाबत आपल्या विभागातील/महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना अवगत होण्याकरीता सूचना फलकावर सूचना लावण्यात यावी.

विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद ][
परिपत्रक क्रमांक-०१ ][
पी.जी./प्रवेश/२०१७-२०१८/1434-1883 ][
दिनांकः-२८ मार्च २०१८. ][

मा.प्र. कुलगुरु

या परिपत्रकाची प्रत,

०१. समन्वयक, पदव्युत्तर केंद्रीय प्रवेशपूर्व परीक्षा २०१८-२०१९ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर, औरंगाबाद
०२. सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर, औरंगाबाद व उप-परिसर, उस्मानाबाद.
०३. प्राचार्य, मॉडेल कॉलेज, घनसांवगी, जि. जालना.
०४. प्राचार्य, सर्व संलग्नित पदव्युत्तर महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
०५. मा.संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ संकेतस्थळांवर प्रकाशित करण्यात यावे.

मा.प्र. कुलगुरु

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University ★ Aurangabad ★